NEHRU BAL PUSTAKALAYA

# चालल्या बाईसाहेब बसमधून

वल्लीकानन



अनुवाद

सविता जाजोदिया



नेहरू बाल पुस्तकालय

# चालल्या बाईसाहेब बसमधून


**वल्लीकानन**

चित्रांकन
**एस. गोपालन**

अनुवाद
**सविता जाजोदिया**



नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया




ISBN 81-237-3736-X

पहिली आवृत्ती : 1985 *(शके 1906)*
तिसरी आवृत्ती : 1990 *(शके 1912)*
चौथी आवृत्ती : 1990 *(शके 1913)*
पाचवी आवृत्ती : 1991 *(शके 1913)*
सहावी आवृत्ती : 1992 *(शके 1914)*
सातवी आवृत्ती : 2002 *(शके 1923)*
आठवी आवृत्ती : 2003 *(शके 1924)*
मूळ © वल्लीकानन, 1982
मराठी अनुवाद © नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया, 1985
Madam Rides the Bus *(Marathi)*


**रु. 14.00**

संचालक, नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया, ए-5 ग्रीन पार्क
नवी दिल्ली-110 016 यांनी प्रकाशित केले.

# चालल्या बाईसाहेब बसमधून

एक होती मुलगी. नाव होते वल्ली अम्माई. जेमतेम आठ वर्षांची होती. आपल्या घराच्या उंबरठ्यावर उभे राहून रस्त्यावरचा गजबजाट बघायची तिला भारी हौस होती.

वल्ली अम्माईला आपले नाव आवडायचे. नाहीतरी जगात प्रत्येकालाच आपले नाव आवडते.





तरीदेखील कधी कधी मात्र तिला आपल्या नावाचा तिटकारा वाटायचा. कारण त्या नावावरून मुली तिला चिडवायच्या–

वल्ली अम्माई! वल्ली अम्माई!
असा कसा गं नवरा बाई!
वल्ली अम्माई! वल्ली अम्माई!
गेला कसा गं सोडून बाई!

अशा वेळी त्या मुलींना काय उत्तर द्यावे हे तिला सूचत नसे. तिचे डोळे भरून यायचे आणि ती त्यांना तोंड वेडावून दाखवायची.

ते बघून मुली आणखीनच चेकाळायच्या. मुद्दाम आणखी मोठ्याने गाऊ लागायच्या–

तोंड बघा तोंड
वाकडंच तोंड।
केले किती नखरे
तरी कुठे सुधरे ॥

ते ऐकून वल्ली अम्माईला रडू कोसळायचे. हुंदके देत ती आत घरात निघून जायची. आईवडिलांनी आपले हे असले नाव ठेवले याचा तिला राग पण यायचा. तिचा हा राग थोडाच वेळ टिकायचा. थोड्याच वेळात पुन्हा तिला आपले नाव आवडू लागायचे.

वल्ली अम्माईच्या घरासमोरच्या रस्त्यावर मुले खेळायची, पण त्यात तिच्या वयाचे कुणीही नव्हते, घराच्या उंबरठ्यावर उभे राहण्याखेरीज दुसरे काहीही तिच्या हातात नव्हते. दुसऱ्या गल्ल्यातून तिच्या वयाची मुले खेळायची, पण तिकडे जायचे नाही म्हणून आईने सक्त ताकीद दिलेली होती.

घराच्या उंबरठ्यावर उभे राहण्यातदेखील काही कमी मौज नव्हती. इतर मुलांना खेळण्यात गंमत वाटायची. हिला बघत बसण्यातही गंमत वाटायची. नुसते बघून बघून तिला कित्येक गोष्टी माहीत झाल्या होत्या.

एकदा एक इंग्रज सैनिक त्या वाटेने गेला. भारताला स्वातंत्र्य मिळण्यापूर्वीचा तो काळ होता. इंग्रज अजून भारत सोडून गेले नव्हते. किती गोरापान होता तो इंग्रज माणूस. त्याचे कपडे तरी किती छान होते. त्याला नुसते बघण्यासाठी बायकांची कोण धावपळ उडाली होती.


पण काही मुले आणि काही मोठी माणसे देखील त्याला घाबरली होती. घरात दडून बसली होती. वल्ली अम्माई मात्र मुळीच घाबरली नव्हती. तिने काय केले ठाऊक आहे? दोन्ही टाचा जुळवल्या आणि मोठ्या थाटात त्याला सलाम ठोकत म्हणाली, ''सलाम.''

त्या इंग्रजाने मागे वळून पाहिले. वल्ली अम्माईकडे बघून तो हसला.

''गुड मॉर्निंग,'' त्याने म्हटले आणि तो पुढे निघून गेला. वल्ली अम्माई आनंदाने वेडावून गेली. हसू काय लागली, नाचू काय लागली, उड्या काय मारू लागली. भेटेल त्याला ती सांगू लागली की एक इंग्रज माणूस तिच्याशी बोलला.

''पोर चांगली धीट आहे बरं का!'' अनेक लोकांनी तिचे कौतुक केले. आळीतल्या लोकांमध्ये आता तिचा भाव वाढला होता.

ज्या रस्त्यावर वल्ली अम्माईचे घर होते, तिथे फारशी वर्दळ नव्हती हे खरे, पण तो काही अगदीच सुना रस्ता नव्हता. अधून-मधून कुणीतरी कसल्यातरी कामासाठी इकडे तिकडे जातायेतांना दिसायचे. कधी एखादी बैलगाडी तिकडून जायची. तिच्या चाकांना तेल घातलेले नसल्याने त्यांचा कर्रकर्र आवाज व्हायचा, बैलांच्या गळ्यात बांधलेली घुंगरे किणकिणायची. एखादे कुत्रे बाणासारखे वेगाने रस्त्यावरून धावत जायचे, जणू एखाद्या महत्वाच्या कामागिरीवर निघाले असावे. पण मध्येच त्याच्या गतीला खो बसायचा. ते इकडे तिकडे हुंगू लागायचे. मध्येच एक तंगडी उचलून रस्त्यावरचे एखादे रोपटे ओले करायचे. मग पुन्हा मागं वळून आल्या दिशेला धावत सुटायचे. असे वाटायचे जणू ते एखादी वस्तू विसरले असावे आणि ती आणण्यासाठी परत निघाले असावे. आणि हो! रत्यावरून भिकारी तर नेहमीच जायचे यायचे. लहानसहान जिनसा विकणाऱ्या फेरीवाल्यांचीही









जा ये चाललेली असायची. वल्ली अम्माई दिवसभर हे सगळे बघत बसायची, तिचे मन त्यात रंगून जायचे, रस्त्यावरच्या मौजा बघताना तिला कधी कंटाळा येत नसे.

पण या सर्वांमध्येही तिचे लक्ष वेधून घेणारी गोष्ट म्हणजे शहराची बस. तासाला ती तिथून जायची. कधी जाताना कधी येताना बसमध्ये दर वेळी नवीन प्रवासी दिसायचे. बस बघणे हा वल्ली अम्माईचा कधी न संपणारा आनंदाचा ठेवा होता.

रोज रोज अगदी न चुकता ती बस बघायची आणि मग एक दिवस, एक विचार तिच्या मनात डोकावला. काही केल्या तो विचार तिच्या मनातून जाईनाच. तिच्या मनाने घेतले की एक ना एक दिवस आपण या बसमधून प्रवास करायचाच. लहानसा विचार. पण त्याने मूळ धरले. तो वाढत गेला. रस्त्याच्या कोपऱ्यावर बसमधून चढणाऱ्या उतरणाऱ्या लोकांकडे ती मोठ्या हपापल्या नजरेने बघायची. त्या माणसांच्या चेहेऱ्यांनी तिच्या इवल्याशा मनात असंख्य इच्छा निर्माण केल्या. असंख्य स्वप्ने, असंख्य आशा फुलवल्या. कधी कधी तिची एखादी मैत्रीण तिला आपल्या बसच्या प्रवासाची हकीकत सांगायची. शहरातील एखाद्या दृश्याचे वर्णन करायची. ते ऐकून तिचा जळफळाट व्हायचा. मत्सराने ती इंग्रजीत ओरडायची, "प्राऊड, प्राऊड..." वल्ली आणि तिच्या मैत्रिणींना त्या शब्दाचा अर्थही ठाऊक नव्हता.

वल्लीच्या गावातून जे लोक कधीमधी शहरात जायचे, तसेच जे लोक नेहमी बसमधून प्रवास करायचे, त्या लोकांचे बोलणे वल्ली नीट लक्षपूर्वक ऐकायची. सतत कित्येक दिवस आणि महिने त्यांचे बोलणे ऐकून ऐकून बसच्या प्रवासाविषयी बरीच माहिती तिला झाली होती. तिने स्वतःदेखील लोकांपाशी चौकशी केली होती.

तिच्या गावापासून शहर दहा कोस दूर होते. एका बाजूचे भाडे होते तीस पैसे. याचाच अर्थ होता जाण्यायेण्याचे मिळून साठ पैसे. शहरात पोचायला

बसला पाऊण तास लागायचा. शहरात पोचून बसमधून खाली न उतरता ती बसमध्येच बसून राहिली आणि आणखी तीस पैसे तिने चुकते केले तर त्याच बसमधून तिला परत गावी येता येणार होते. म्हणजे ती जर गावातून दुपारी एकला निघाली तर पावणे दोन वाजता शहरात पोचेल. आणि मग त्याच बसमधून तीनच्या सुमारास आपल्या गावी परत येऊ शकेल.

अशा तऱ्हेने ती सगळा हिशेब लावीत राहिली, बेत आखीत राहिली.

एके दिवशी काय झाले, बस नेहमीप्रमाणे गावाची सीमा ओलांडून हमरस्त्यावर येत होती. तेवढ्यात कुणाच्या तरी बारीक आवाजातल्या हाका ऐकू आल्या, "बस थांबवा–बस थांबवा." एक छोटासा हात हलत होता.

बसची गती मंदावली. कंडक्टरने बाहेर डोकावून पाहत किंचित त्रासिक स्वरात म्हटले, "अरे बाबा, कोण येतंय? त्यांना लवकर यायला सांग...कळलं ना?"

"बस थांबवा...मलाच यायचंय," वल्लीने म्हटले.

"खरं? चेष्टा की काय?" कंडक्टरने विचारले.

"ऊं हूं...मलाच शहरात जायचंय आणि हे तुमचे भाड्याचे पैसे," जवळची चिल्लर दाखवीत वल्लीने उत्तर दिले.


"बरं, बरं! अगोदर बसमध्ये चढ तर खरी," कंडक्टरने म्हटले आणि मग तिला हलकेच उचलून बसमध्ये चढवले.


"चू चू चू...मी स्वतः चढेन की...कशाला मला उचलताय?"

कंडक्टर मोठा विनोदी स्वभावाचा होता. "अहो बाईसाहेब, अशा रागावता काय?...बसा...या अशा या बाजूला..." त्याने म्हटले.

"वाट द्या...वाट...बाईसाहेब येताहेत."

दुपारच्या वेळी बसमध्ये फारशी गर्दी नसायची. अवघ्या बसमध्ये जेमतेम पाचसहा प्रवासी होते. सगळेजण वल्लीकडे बघू लागले. कंडक्टरच्या बोलण्याला हसू लागले.





वल्ली ओशाळली. मान वळवून रिकाम्या दिसलेल्या जागेवर झटदिशी जाऊन बसली.

"गाडी हाकायची का बाईसाहेब?" कंडक्टरने हसून विचारले. त्याने दोनदा शिटी वाजवली. बस पुढे निघाली.

ही एक अगदी नवी बस होती. बाहेरच्या बाजूने ती पांढरी होती. त्यावर काही हिरव्या रेघा होत्या. आतमध्ये, छताशी असलेले भांडे चांदीसारखे चकाकत होते. तिच्या नेमके समोर एक छानसे घड्याळ होते. बसायच्या जागा कशा मऊ आणि आरामशीर होत्या.

डोळे मोठे करून वल्ली हे सगळे बघत होती. खिडक्यांवर पडदे होते त्यामुळे तिला बाहेरचे दृश्य बघता येत नव्हते. ती आपल्या जागी उभी राहिली आणि बाहेर डोकावून बघू लागली.

बस यावेळी एका कालव्याच्या काठाकाठाने चालली होती. रस्ता अगदी अरुंद होता. एका बाजूला कालवा होता. त्याच्या पलीकडे माडाची झाडे, हिरवेगार माळरान, दूरवर डोंगर आणि निळे आभाळ दिसत होते. दुसऱ्या बाजूला खोल खाचर होते. त्याच्या पलीकडे दूरदूरवर पसरलेली सोनेरी शेते. नजर पोचत होती तिथवर हिरवळच हिरवळ!

वा! काय छानदार दृश्य आहे! अचानक एक हाक ऐकून ती दचकली. कुणीतरी म्हणत होते, "बाळ, अशी उभी नको राहूस. खाली बैस!"

वल्ली निमूटपणे खाली बसली आणि बोलणाऱ्याकडे बघू लागली. तो एक मोठा माणूस होता. तिच्या भल्यासाठीच त्याने सूचना केली होती. पण तिला मात्र त्याचा राग आला.

"मी काही कुक्कुलं बाळ नाही," ती कुर्र्यात म्हणाली, "पुरतं भाडं दिलंय."

कंडक्टरने मध्येच तोंड खुपसले. म्हणाला, "हो, हो. या मोठ्या बाईसाहेब आहेत. मुलांना थोडंच स्वतः आपलं भाडं देऊन शहरात जाता येतं?"

वल्लीने डोळे वटारून त्याच्याकडे पाहिले. "मी बाईसाहेब नाही. समजलं?...आणि हो, तुम्ही अजून मला तिकीट का नाही दिलं?"

"अरे हो!" कंडक्टरने तिची नक्कल करीत म्हटले. सर्वजण हसू लागले. वल्लीदेखील हसू लागली.

कंडक्टरने तिकीट फाडले. ते तिला देत म्हटले, "आरामात बसा. जागेसाठी पैसे दिल्यावर असं उभं राहायचं नसतं."

"मला असंच आवडतं," वल्लीने उत्तर दिले. "उभी राहशील तर पडशील. लागेल तुला. बसनं अचानक वळण घेतलं तर हिसका बसेल. म्हणून तुला बसायला सांगितलं बाळ!"

"पण मी बाळ नाही म्हणून सांगितलं ना तुम्हाला?" तिने चिडून म्हटले, "मी आठ वर्षाची आहे." "खरंच की! मी तरी काय मूर्ख! आठ वर्षाची? अब्बू!"

बस थांबली. काही नवीन प्रवासी बसमध्ये चढले. कंडक्टर त्या कामात थोडा वेळ गुंतला. वल्ली बसली. आपली जागा तर नाही ना जायची याची तिला भीती वाटली. एक म्हातारीशी बाई आली आणि तिच्या शेजारी बसली.


"एकटीच चाललीस का बाळ?" बस चालू होताच तिने वल्लीला विचारले.

वल्लीला तिचा चेहेरा अगदी घाणेरडा वाटला. तिच्या कानांना केवढी मोठाली भोके होती आणि त्यात कसले गचाळ दागिने लटकत होते. तिच्या तोंडाला तंबाखूचा वास येत होता आणि तोंडातून पिंक बाहेर ओघळणार असं वाटत होतं. शी! "हो, मी एकटीच चाललेय. तिकीट आहे माझ्यापाशी," तिने तुटकपणे सांगितले.

"हो, हो...शहरात चाललीय...तीस पैशाचं तिकीट घेऊन..." कंडक्टरनेही माहिती दिली.

"तुम्ही तुमचं काम करा बघू," वल्लीने दटावले. पण तिला स्वतःला हसू येत होते.

कंडक्टरही हसू लागला.





"इतक्या लहान पोरीनं असं घरातून एकटं पडणं चांगलं नाही," म्हातारीची वटवट चालली होती. "शहरात कुठं जायचंय, कोणत्या आळीत, कुणाच्या घरी ते तरी ठाऊक आहे का?"

"तुम्ही नका काही काळजी करू. मला सगळं ठाऊक आहे," वल्लीने म्हटले. म्हातारीकडे पाठ करून ती खिडकीतून बाहेर बघू लागली.

हा तिचा पहिलाच प्रवास होता. आणि त्यासाठी तिने किती काळजीपूर्वक सर्व योजना आखली होती. इकडून तिकडून मिळालेली सर्व चिल्लर जमवली होती—आपल्या मनातल्या इच्छांना कितीदा तरी आवर घातला होता—लिमलेटच्या गोळ्या, खेळणी, फुगे काही काही सुद्धा विकत घेतले नव्हते. पै पैसा जमवून एकूण साठ पैसे गोळा केले होते. हे सगळे करणे किती अवघड होते. गावच्या जत्रेत त्या दिवशी फिरत्या चक्रात बसायची किती हौस वाटली होती. खिशात पैसेदेखील होते. तरीसुद्धा तिने मन आवरले होते. पैसे वाचवले होते.

पैशाचा प्रश्न सुटला होता. मग दुसरा प्रश्न पुढे आला होता. आईला सांगितल्याखेरीज कसं घरून सटकायचं? पण फारशी डोकेदुखी न होता हा प्रश्न देखील सुटला होता. दररोज दुपारी साधारणपणे एक ते चारच्या दरम्यान आई झोप घ्यायची. दुपारचा हा वेळ वल्ली गावात भटकण्यात घालवायची. तोच वेळ आज ती गावाबाहेरच्या फेरफटक्यात घालवीत होती.

बस धावतच होती—कधी मोकळ्या मैदानातून, कधी रस्त्याच्या कडेच्या दुकानांसमोरून, तर कधी एखादे गाव मागे टाकत. कधी कधी तर वाटायचे की समोरून येणाऱ्या वाहनाला किंवा पायी चालणाऱ्या माणसाला ती गडपच करणार! पण छट्! सफाईदारपणे त्या सर्वांना मागे टाकत, सावधपणे ती पुढे निघाली. मधूनच झाडे धावत येताना दिसायची. पण बस जवळ आली की ती झाडे निमूटपणे उभी रहायची.

अचानक वल्ली आनंदाने टाळ्या पिटू लागली. एक वासरू, शेपटी वर उंचावून, रस्त्याच्या मधून, बसच्या समोरून धूम धावत होते. त्याला बाजूला

करण्यासाठी ड्रायव्हर भोंगा वाजवत होता. त्यामुळे ते आणखीनच बिचकून जोरात धावत होते.

वल्लीला ते दृश्य मोठे गमतीशीर वाटले. ती इतकी हसली, इतकी हसली की तिच्या डोळ्याना पाणी आले.

"पुरे, पुरे बाईसाहेब," कंडक्टरने म्हटले, "उद्यासाठी देखील थोडं हसू शिल्लक राहू द्या."

मग बस आगगाडीच्या फाटकापाशी पोचली. दूरवरून येणारी आगगाडी एखाद्या ठिपक्यासारखी दिसत होती. ती जसजशी जवळ येत गेली तसतशी मोठी होत गेली. आणि फाटकाजवळून धाडधाड करीत गेली तेव्हा तर बसच हादरली. मग बस पुढे निघाली. रेल्वे स्टेशनवर पोचली. तिथून ती एका रस्त्यावर आली. त्या रस्त्यावर गर्दी होती. मग बसने एक वळण घेतले आणि ती एका मोठ्या रस्त्यावर आली. वा! दोन्ही बाजूंना काय सुरेख दुकाने होती. त्यात कसे छान रंगीबेरंगी कपडे व चकाकत्या वस्तू सजवलेल्या होत्या. आणि गर्दी तरी किती? बाप रे! वल्ली आ वासून सगळीकडे नुसती बघत राहिली.

अखेर बस थांबली. सगळेजण खाली उतरले. "काय बाईसाहेब, खाली नाही का उतरायचं? तीस पैशाचं तिकीट इथं संपलं," कंडक्टर म्हणाला. "अंहं. याच बसमधून मी परत जाणार आहे," वल्लीने सांगितले. तिने खिशातून आणखी तीस पैसे काढले आणि ते कंडक्टरच्या हातावर ठेवले.


"का? काय झालं?"


"काही नाही. बसमधून फिरावंसं वाटलं इतकंच!"

"शहर नाही का बघायचं?"

"एकटं? नको रे बाबा! मला भीती वाटते," तिने म्हटले. तिचा आवाज व हावभाव बघून कंडक्टरला खूप गंमत वाटली.

"पण बसमधून येताना तर तुला भीती नाही वाटली!" त्याने विचारले.





"त्यात काय होतं भिण्यासारखं?" वल्ली म्हणाली.

"बरं, आता खाली उतरून त्या समोरच्या हॉटेलात जा आणि कॉफी पी. त्यात भ्यायचं काही कारण नाही."

"छे, छे, मला नको कॉफी."

"बरं तर, मी तुझ्यासाठी आणतो काही."

"नको हो, खरंच नको," वल्ली ठामपणे म्हणाली. ठरलेल्या वेळी बस चालू झाली. यावेळीही फारशी गर्दी नव्हती.

"तुझी आई नाही का शोधायाची तुला?" वल्लीला तिकीट देत कंडक्टरने विचारले.

"मला नाही कुणी शोधायचं," वल्ली म्हणाली. पुन्हा तेच छानदार दृश्य! पण वल्लीला अजिबात कंटाळा आला नाही. गेल्या वेळेसारखीच या वेळीही तिला प्रत्येक गोष्टीची गंमत वाटत होती. प्रत्येक दृश्य ती नवलाईने बघत होती.

अचानक ते काय दिसतंय? अयाई-ते मघाचं वासरू...रस्त्यावर मरून पडलं होतं. तिकडून जाणाऱ्या दुसऱ्या एका वाहनाखाली ते सापडलं होतं.

थोड्या वेळेपूर्वी मजेत बागडणारा तो सुंदर प्राणी आता मरून पडला होता. त्याची सर्व हालचाल थंडावली होती. देखणेपण नाहीसं झालं होतं. आता तो किती भयंकर दिसत होता. पाय वेडेवाकडे पसरलेले, डोके भिजलेले, रक्ताच्या थारोळ्यात पडलेला...

छे, छे, बघवत नाहीये!

"अहो, मघाशी आपल्या बसपुढे धावत होतं तेच वासरू का हो ते?" वल्लीने कंडक्टरला विचारले. कंडक्टरने मान हलवून होकार दिला.

बस पुढे धावतच होती. पण त्या वासराचा विषय काही वल्लीच्या डोक्यातून जाईना, तिच्या उत्साहावर पाणी पडले. आता तिला गंमत वाटेना, ती आपल्या जागेवर चुपचाप बसून राहिली.

तीन वाजून चाळीस मिनिटांनी बस तिच्या गावी पोचली. वल्ली उठून उभी राहिली. जांभई देत तिने पाठ सरळ केली आणि कंडक्टरचा निरोप घेत म्हणाली, ''अच्छा भेटू पुन्हा कधीतरी.''

''बराय बाईसाहेब! पुन्हा कधी बसमधून फिरावसं वाटलं तर जरूर या. आणि हो, भाड्याचे पैसे आणायला मात्र विसरू नका हं!'' कंडक्टरने म्हटले.

वल्ली हसली. टुणदिशी तिने बसमधून खाली उडी मारली आणि ती धावत घराकडे निघाली.

ती घरी पोहचली तेव्हा आई उठली होती. कुणाशी तरी बोलत होती. बाप रे! या तर पलीकडच्या आळीतल्या ठमाकाकू. एकदा बोलायला लागल्या की थांबायचे नाव नको...

''कुठं होतीस इतका वेळ?'' वल्लीला बघताच काकूने विचारले.


काकूने तो प्रश्न अगदी सहज विचारला होता. तिला उत्तराची अपेक्षाही नव्हती. म्हणून वल्ली काही न बोलता नुसतीच हसली. आई व काकूंच्या गप्पा पुढे सुरू झाल्या...


''खरंय तुमचं म्हणणं, खरंय,'' वल्ली म्हणाली. ''आपल्या नकळत अनेक घटना आपल्या आजू-बाजूला व साऱ्या जगात घडत असतात...त्या सर्वांविषयी आपल्याला किती माहिती असते? आणि समजा आपल्याला काही गोष्टी कळल्या तरी त्या आपल्याला खरोखरीच पूर्णपणे समजतात का?'' वल्लीची आई म्हणाली.

''काय खरंय?'' आईने डोळे वटारून विचारले.


''तू सांगत होती तेच! बाहेरच्या जगातल्या कित्येक गोष्टींचा आपल्याला पत्ताच नसतो.''

''या चिमुरडीचं बोलणं ऐका! आजीबाईचा आव आणून मोठ्यांच्या बोलण्यात नाक खुपसतेय!'' काकूने शेरा मारला.










वल्ली स्वतःशीच हसली. आपल्या हसण्यामागचा अर्थ त्यांना कळावा अशी तिची इच्छाही नव्हती.

आणि त्यांना तो कधीच कळणारही नाही. खरं ना?







*Printed at* J.J. Offset Printers, Patparganj, Delhi-92.

रु. 14.00 ISBN 81-237-3736-X

नॅशनल बुक ट्रस्ट, इंडिया

